## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२०/०५/२०१९
## दि.१९/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३७३/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | शामराव नाईकनवरे,वय-७७ वर्ष,रा.येरवडा,पुणे |
| **आरोपी** | रिक्षा मधुन आलेले दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०५/२०१९ रोजी १३/१५ वा. साई पान टपरी,कश्मिरी कॉलनी,चित्रा चौका जवळ येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे साई पान टपरीचे दुकानात बसले असताना,यातील नमुद रिक्षा मधुन आलेले दोन अनोळखी इसमांपैकी,पाठीमगील सिटवर बसलेल्या एका इसमाने फिर्यादी यांना सिगरेट मागितली असता,फिर्यादी हे सिगारेट देण्यासाठी खाली वाकले असता,सदर इसमाने फिर्यादी यांचे गळयातील २५,०००/- रुपये किंमतीची सोन्याची चैन जबरदस्तीने खेचुन चोरून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मंगेश भांगे ८८०५३३३०३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २५४/१९,भादविक ३३८,३७९ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५६,रा.काळा चौकी,मुंबई |
| **आरोपी** | अनोळखी इसम वय अंदाजे ३८ ते ४० वर्षे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०५/२०१९ रोजी १५/३० वा. स्वारगेट बस डेपो,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे स्वारगेट बस डेपो येथुन सांगोला मुंबई सेंट्रल या एस.टी. बस मध्ये मुंबईला जाण्यासाठी बसले असताना,त्यांचे शेजारी पुण्याहुन बसलेल्या एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांचेशी ओळख वाढवुन,त्यांना गुंगीकारक औषधाचे बिस्कीट खाण्यास देवुन, फिर्यादी यांना गुंगी आल्यानंतर,सदर इसमाने फिर्यादी यांचे पॅन्टचे खिशातील रोख ३६ हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण ९५ हजार रू किचा ऐवज चोरी करून नेला. सदरचा प्रकार फिर्यादी यांना मुंबई सेंट्रल येथे आल्यावर समजला आहे. (सदरचा गुन्हा मुंबईहुन वर्ग होवुन येताच स्वारगेट पो स्टे येथे दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जे.कदम ९८२३६२४५८५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे २५६/१९,भादविक ३७९,४२७ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५४,रा.धुळे |
| **आरोपी** | अज्ञात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०५/२०१९ रोजी दु.१२/२० ते १६/०० वा.चे दरम्यान सी.पी.डब्ल्यु.डी. कॉलनी गल्ली नं.१२,येथील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे सुनेच्या भावाचे लग्नासाठी महर्षीनगर झांबरे पॅलेस येथे आल्या होत्या. सदर ठिकाणी कारला पार्कींग नसल्याने,त्यांनी त्यांची कार नमुद ठिकाणी रोडवर पार्क केली असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे कारची काच फोडुन,कार मधील १ लाख ५ हजार रू किचे सोन्या-चांदीचे दागिने चोरी करून नेले. तसेच वरीलप्रमाणे फिर्यादी प्रविण सुर्वे,वय-४० वर्षे,रा.इंद्रायणीनगर,भोसरी,पुणे यांचेही कारची काच फोडुन त्यांचे पत्नीचे पर्स मधील ५ हजार रूपये रोख रक्कम चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.फौज. एस.बी.जगताप ७२४९३३४७४६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ४८२/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५८,रा.औंध,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०५/२०१९ रोजी १७/३० वा. फिर्यादीचे राहते घरी औंध,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे मुलीसह त्यांचे रहाते घरापासुन ते परीहार चौक पायी जात असताना,फिर्यादी यांचे मुलीच्या हाता मध्ये असलेल्या मोठया पर्सचे कप्प्यात असलेल्या छोटया पर्स मधुन कोणीतरी अज्ञात इसमाने प्लेटीनियम दोन डायमंडच्या अंगठया ४,९६,०००/- रु किच्या छोटया पर्ससह चोरुन नेल्या आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विश्वास चव्हाणके ९९२१६७०००५ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३७४/१९,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ७० वर्ष,रा.येरवडा बाजार,पुणे |
| **आरोपी** | ॲटो रिक्षा नं.एमएच/१२/एनडब्ल्यु/१४२० मधून आलेले दोन अनोळखी इसम,त्यापैकी रिक्षा चालवणारा इसम वय अंदाजे २० वर्षे सावळया रंगाचा,रिक्षाचे पाठीमागे बसलेला इसमाचे अंगात निळी जिन्स पॅंट व काळा पांढरा टि शर्ट घातलेला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०५/२०१९ रोजी १४/०० वा. धनराज जनरल स्टोअर्स,स.नं.१,येरवडा बाजार,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे धनराज जनरल स्टोअर्स नावाचे दुकानत असताना,यातील नमुद रिक्षा मधील दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे दुकानात येवून,त्यापैकी एका इसमाने फिर्यादी यांना बोलण्यात गुंतवुन,इतर इसमाने फिर्यादी यांचे गल्ल्यातील ४,९००/- रुपये रोख रक्कम चोरून नेले आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पा.निरी. सुशिल बोबडे ९८२३०७९५९३ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**